

# आधुनिक भारताचा इतिहास

(सन : १७५७ ते १८५७)

प्रा. आनंद काळबांडे । डॉ. सर्जेराव भामरे

# १ विस्तारवादी धोरण

ब्रिटीशांनी भारतात जे विशाल साम्राज्य निर्माण केले ते केवळ युद्धाच्या मार्गानेच नव्हे तर परिस्थिती पाहुन काही वेळा कुटनितीचाही वापर त्यांनी केला. या दृष्टीने त्यांची तैनाती फौजेची पद्धत व खालसा धोरण अतिशय महत्त्वाचे ठरले. या दोन्ही पद्धतीचा मोठ्या बुद्धीमत्तेने व मुत्सद्देगिरीने उपयोग करुन गव्हर्नर जनरल लार्ड वेलस्ली व लॉर्ड डलहौसी यांनी भारतातील महत्त्वपूर्ण प्रदेश गिळंकृत केला. या पद्धतीतून भारतात ब्रिटिश साम्राज्याचा फार मोठा विस्तार केला. त्यामुळे भारताच्या नकाशात कमालीचा बदल झाला. त्याच बरोबर इंग्रजांच्या साम्राज्यात व सामर्थ्यात वाढ झाली. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी विस्तारीकरणाच्या धोरणात सुसंगत अशा अनेक पद्धती वापरल्यात. लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज व लॉर्ड डलहौसी या तीन गव्हर्नरच्या कारकिर्दीत कंपनीचा फार मोठ्या प्रमाणात  साम्राज्यविस्तार झाला. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

## १) लॉर्ड वेलस्ली (१७९८-१८०५)

वयाच्या सदतीसाव्या वर्षी इ.स. २६ एप्रिल १७९८ ला लॉर्ड वेलस्ली हा बंगलाचा गव्हर्नर जनरल बनला. त्याचे नाव सुरुवातीला लॉर्ड मॉगिग्टन हाते. नंतर तो माविर्वस वेलस्ली म्हणुन नावाजला. भारतात येऊन बंगालचा गव्हर्नर म्हणुन पदभार सांभाळतांना त्यांनी सर जॉन शोरचे तठस्थतेचे धोरण बदलले व विस्तारवादी धोरण स्विकारले. तो पक्का साम्राज्यवादी होता. भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य जास्तीत जास्त वाढवावे हे त्याचे ध्येय होते.

लार्ड वेलस्लीचा जन्म इ.स. १७६१ ला झाला. वेलस्ली प्रथमता

## ◆ तैनाती फौज पद्धत किंवा साहाय्यक करार प्रणाली–

लॉर्ड वेलस्लीने भारतात ब्रिटिश सत्तेच्या विस्तारासाठी जे तत्त्व धोरण स्वीकारले होते त्याला तैनाती फौज या नावाने ओळखले जाते. १८५६ पर्यंत या पद्धतीचा स्वीकार करुन भारतातील संस्थानिकांची सत्ता संपुष्टात आली. लॉर्ड वेलस्लीने या तत्त्वाचा (पद्धतीचा) अवलंब करुन भारतात इंग्रजांचे साम्राज्य प्रस्थापित केले. फार मोठा विस्तार घडवून आणला. भारतात सर्वत्र कंपनीची सत्ता स्थापन केली. तैनाती फौजेची पद्धत लॉर्ड वेलस्लीनेच सर्व प्रथम अमलात आणली नाही, परंतु त्याने या पद्धतीला पुर्णत्वाचे स्वरुप प्राप्त करुन दिले असे

म्हणता येईल. मराठ्यानी चौथाई व सरदेशमुखी कर वसुल करुन त्या राज्यांना संरक्षण दिले होते. या पद्धतीवरुनच तैनाती फौजेचा उगम झाला, असे न्या. रानडे यांनी म्हटले आहे. वेलस्लीने या पद्धतीस शास्त्रशुद्ध बैठक दिली एवढे निश्चित.

वेलस्लीने तैनाती फौज पद्धत अमलात आणली. याला Subsidiary system असे म्हणतात. इंग्रज कंपनीची स्थिती सुधारण्यासाठी, भारतीय शासकावर नियंत्रण बसवण्यासाठी, सामर्थ्य संपन्न फौज उभी करण्यासाठी, भारतातील फ्रेंच प्रभाव नाहीसा करण्यासाठी व इंग्रज कंपनीला प्रभुत्व संपन्न शक्ती (Sovoreing Power) बनविण्यासाठी त्याने तैनाती फौजेची पद्धत भारतीय शासकांना स्वीकारण्यास लावण्यास पराकाष्ठचे प्रयत्न केले. त्याअगोदरही भारतातील लहानमोठ्या राज्यांना इंग्रज सैनिक सहाय्य करुन राजकारणात हस्तक्षेप करीतच होते. असे सहाय्य करुन द्रव्य, भुप्रदेश पदरी पाडून घेण्याचा प्रकार इंग्रजांनी अगोदरच आरंभ केलेला असला तरी त्याला योजनाबद्ध स्वरुप देऊन भारतीय सत्तेचे बळ कमी करण्याचा प्रयत्न वेलस्लीने केला.

### ♦ तैनाती फौज पद्धतीची वैशिष्ट्ये / अटी / स्वरुप-

तैनाती फौज पद्धतीच्या धोरणानुसार भारतातील दुर्बल राज्यांना त्यांच्या संरक्षणासाठी इंग्रजी फौज देण्यात येत असे. त्या मोबदल्यात देशी राज्याचे (त्या दुर्बल राज्याने) कंपनीस रोख रकमेऐवजी आपल्या राज्याचा काही प्रदेश तोडून द्यावा लागत असे. इंग्रजी तैनाती फौज स्विकारणाऱ्या राज्यांना पुढील अटी मान्य कराव्या लागत होत्या.

१) संरक्षणासाठी इंग्रजी तैनाती फौज स्वीकारावी.

२) त्या फौजेच्या खर्चासाठी राज्याचा काही प्रदेश कंपनीला कायमचा देणे.

३) आपल्या प्रदेशावरील कंपनीची सत्ता मान्य करणे.

४) आपल्या राज्यातील सर्व प्रकारचे परराष्ट्र व्यवहार ईस्ट इंडिया कंपनीच्या नियंत्रणाखाली करावेत.

५) आपल्या दरबारात (राजधानीत) एक इंग्रज रेसिडेंट (अधिकारी) ठेवावा. व त्याच्या मार्गदर्शनानुसार राज्यकारभार करावा.

## २) लार्ड डलहौसी (१८४८-५६) चे विलीनीकरण सिद्धान्त किंवा खालसा धोरण

ब्रिटिशकालीन भारताच्या इतिहासात जे धुरंधर गव्हर्नर होऊन गेलेत त्यात सर्वात उच्चस्थान व दैदिप्यमान लॉर्ड डलहौसीच समजला जातो. भारतात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करणाऱ्या प्रमुख गव्हर्नर जनरलपैकी लॉर्ड डलहौसी हा शेवटचा चवथा गव्हर्नर जनरल होय. तो अतिशय महत्त्वाकांक्षी व साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कर्ता होता. इ.स. १८४८ ते १८५६ या आठ वर्षाच्या काळात त्याने बंदुकीची एक गोळीही न झाडता त्याने भारताचा राजकीय नकाशा पुर्णपणे बदलला व रंगाने लाल केला. म्हणुनच त्याला ब्रिटिश साम्राज्याचा शिल्पकार असे म्हणतात. आपल्या कर्तबगारीने संबंध देश हालवून सोडला. भारतातील ब्रिटिश सत्तेच दृढीकरण पूर्ण करण्याचे कार्य डलहौसीने केले. लॉर्ड हार्डिगनंतर सत्तेवर येऊन कार्यक्षमतेने आपले कर्तृत्त्व सिद्ध केले. वेलस्लीने भारतीय राज्यामध्ये रेसिडेंट पाठविला, तैनाती फौज ठेवली तर डलहौसीने आपल्या प्रसिद्ध विलीनीकरणाच्या तत्त्वानुसार ही राज्यच खालसा केली. या विलीनीकरणामुळे ब्रिटिश राज्य अधिक म्जबुत झाले.

डलहौसी भारतात आला तेव्हा येथे अशी अनेक देशी संस्थाने, राज्य

होते की जी इंग्रजांची मांडलीक असूनही स्वतंत्र होती. भारतात कंपनीची सत्ता सार्वभौम असल्यामुळे देशी राज्यांच्या मार्फत राज्यकारभार करण्याची गरज कंपनीला राहिलेली नव्हती. डलहौसीने विविध उपायाद्वारे ही राज्य तसेच नविन प्रदेश ब्रिटिश साम्राज्यात विलीन करण्यास सुरुवात केली. कंपनीच्या प्रदेशाला ते राज्यजोडतांना बहुतेकांच्या मागे कोणते ना कोणते कारण दाखविले. स्वतंत्र राज्य खालसा करण्याचे त्याचे एक विशिष्ट धोरण होते. त्या धोरणालाच 'खालसा धोरण' किंवा 'विलीनीकरणाचे धोरण' (Doctrine of Lapse) असे म्हटले आहे. या धोरणातून भारतात जास्तीचा प्रदेश व उत्पन्न प्राप्त करुन घेण्यासाठी न्याय अन्यायाचा विचार केला नाही, एकही संधी गमावली नाही. एकामागुन एक प्रदेश कंपनीला जोडले व भारतीय सत्ताधिश अल्पावधित कोसळले. त्यासाठी डलहौशीने १) दत्तक विधान नामंजुरी २) राज्यकारभारातील गोंधळ ३) तैनाती फौजेची थकीत बाकी ४) पेन्शन, पदव्या व वर्षासने समाप्ती करुन इ. कारणातून विलीनीकरणाचे धोरण राबविले त्यातील खालसाधोरण जास्त प्रसिद्ध आहे. एखादा संस्थानिक निपुत्रिक मरण पावल्यास त्याच्या मागे राज्याला वारस हवा म्हणुन राजघराण्याला जवळच्या एखाद्या मुलास दत्तक घेण्याची चाल भारतात फार पूर्वीपासून चालु होती. कधीकधी भविष्यकालीन विचार करुन संस्थानिक आपल्या वृद्धपकाळातच अगोदरच असा दत्तक घेऊन ठेवत असत. इंग्रजांनी आपले साम्राज्य वाढवण्याच्या हेतूने यात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. जे संस्थानिक इंग्रजांच्या आधीन झाले होते, अशांना दत्तक घेण्याची वेळ आल्यास सदर दत्तकाला इंग्रजांची मान्यता मिळवावी लागे. ती नसेल तर असे संस्थान खालसा करुन इंग्रजी साम्राज्यास जोडले जाई. अशारितीने दत्तकपुत्र नामंजुरी देऊन राज्य खालसा करण्याचे धोरण गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने योग्यप्रकारे सुरु केले.वरील प्रकारचे विवरण खालील प्रमाणे.

**• संस्थाने खालसा करण्यासाठी डलहौसीने वापरलेले विविध मार्ग-**

**१) दत्तक विधान नामंजुरी देऊन –**

दत्तक वारसा नामंजुरी देऊन डलहौसीने अनेक राज्य खालसा केली. प्राचीन काळापासून हिंदु धर्मशास्त्रानुसार कोणालाही दत्तक घेण्याचा अधिकार

## ३) विल्यम बँटिकच्या सुधारणा

## (लॉर्ड विलियम कव्हेंडिश बेंटिक)

◆ **पार्श्वभुमी–**

लॉर्ड विल्यमबेंटीकचे भारतातील आगमन एका नव्या युगाचा प्रारंभ होता. तो भारतातील पहिला गव्हर्नर जनरल होता की, भारतातील इंग्रजांचे मुख्य कर्तव्य म्हणजे 'जनतेचे कल्याण' होय. त्या विचारानुसार त्यांनी कामगिरी केली. तो उदारमतवादी व्यक्ती, दृढ संकल्पक, योग्य तथा वीर व्यक्ती होता. १८२८ ते १८३५ हा सात वर्षाचा शासनकाळ ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतावरील शासनाच्या इतिहासातील कलाटणीचा बिंदु आहे. कारण हा काळ ब्रिटिश राज्याच्या दृढीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. हाच काळ भारतात गव्हर्नर जनरल म्हणून बेंटीक सत्तेवर होता.

इंग्लडमधील उमराव घराण्यात इ.स. १७७४ ला लॉर्ड विल्यम बेंटीकचा जन्म झाला. त्याचे संपूर्ण नाव विलियम कव्हेंडिश बेंटिक हे होते. इंग्लडचे पंतप्रधान ड्युक ऑफ पोटलंडचा तो पुत्र होता. इस. १८०३ ला मद्रास प्रातांचा गव्हर्नर म्हणून तो भारतात आला तेव्हा वेल्होरच्या सैन्यास माथ्यावर जातीय चिन्ह आणि कानात बाळी घालण्यास बंदी घातल्याने इ.स. १८०६ ला वेल्लोर लष्कराने उठाव केला तो दडपण्यास बेंटिकला अपयश आले असे कंपनीच्या संचालकाचे मत असल्यामुळे त्याला लष्कर पदास सोडून इंग्लडला परत जावे लागले. लष्करी प्रशिक्षण घेतलेले असल्यामुळे इंग्लडच्या नेपोलियन विरोधी युद्धात त्यांनी सहभाग घेतला होता. युद्ध समाप्तीनंतर काही वर्ष तो ब्रिटिश पार्लमेंटचा सदस्य होता. इ.स. १८१९ साली मद्रासचा गव्हर्नर म्हणून पुन्हा त्याची निवड झाली होती. परंतु ते त्यांनी स्विकारली नाही. १८२३ ला लॉर्ड हेस्टिंग्जनी भारतातल गव्हर्नर जनरल पदाचा राजीनाम दिला तेव्हा ते पद मिळविण्यासाठी बेंटीकने कंपनीच्या संचालक मंडळाकडे तसा प्रयत्न केला

# २ भारतविषयक धोरण

भारतावर प्राचीन काळापासून परकीय आक्रमणे होत गेली. अर्वाचीन काळात युरोपियनांचा भारतात प्रवेश झाला. त्यांचा मुख्य हेतू व्यापार करण्याचा होता. व्यापाराबरोबर त्यांच्या भारतात वसाहती स्थापन झाल्या. मात्र या व्यापार स्पर्धेत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील व्यापारी तसेच राजकीय वर्चस्वाच्या स्पर्धेत निर्णायक यश मिळविले. ''तराजू, तलवार, तख्त'' अशा मार्गाने ब्रिटिश भारताचे राज्यकर्ते बनले. भरतात इंग्रजी राज्याची स्थापना झाल्यावर या देशाचे हळूहळू वसाहतीत रुपांतर झाले. भारत हा ब्रिटिशांची एक वसाहत बनला. व्यापारी धोरणाने भारतात येऊन व्यापारातुन जास्तीत जास्त नफा मिळावा यासाठी भारतातील अराजकाच्या परिस्थितीचा फायदा घेतला. ईस्ट इंडिया कंपनीचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध अंगावर दूरगामी परिणाम घडून आले. भारतीय शेती, व्यापार, उद्योगधंदे, हस्तव्यवसाय इत्यादी सर्वच क्षेत्रात कंपनीच्या शासनामुळे महत्त्वपूर्ण बदल घडून आले.

भारतात राजकीय सत्तेचा विस्तार करत असतांना, भारतातून जास्तीत जास्त संपत्ती लुटून इंग्लडला नेणे हा हेतू इंग्रज कधीच विसरले नाहीत. राजकीय अधिसत्ता हे एक माध्यम म्हणून आर्थिक लुट करण्यासाठी, अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी त्याचा वापर केला. भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लडकडे वळविणे इंग्रजांना सोपे होते. इंग्रजांनी भारतावर राज्य करण्यासाठी सत्ता स्थापन केली नाही, तर देशाची आर्थिक लुट बिनधास्त करता यावी यासाठी राजकीय सत्ता हातात घेतली. भारतीय संपत्तीची लुट करणे हा एकमेव हेतु इंग्रज सत्तेचा होता. भारताचे अधिकाधिक शोषण कसेकरता येईल, अशी शासनव्यवस्था

भारतात येणाऱ्या इंग्लिश कापडाची आयात मात्र कशी वाढत गेली त्याची आकडेवारी-

| सन | इंग्लिश कापडाची भारतातील आयात |
|---|---|
| १७९४ | १५६ पौंड (रक्कम) |
| १७९९ | ७,३१७ पौंड |
| १८०३ | २७,८७६ पौंड |
| १८०९ | १,१८,४०८ पौंड |
| १८१४ | १.०८ मिलीयन पौंड |
| १८२९ | ४.५ मिलीयन पौंड |

वस्तुचे प्रमाणही चार पटीने वाढले. तांबे, लोखंडाच्या सलाका, खिळे, जाड कापड, कापसाचा तयार धागा अशा अनेक वस्तु इंग्लडमधुन येऊ लागल्या १८१४ साली इंग्लडचे ८१८२०८ यार्ड कापड भारतात आले तर १८३५ मध्ये ते प्रमाण ५१७७७२७७ यार्ड इतके वाढले. ब्रिटिश भांडवलदार व व्यापाऱ्यांना व्यापारासाठी भारत अधिकच खुला झाला. तत्कालीन ब्रिटिश शासनही उद्योग धंद्यास अनुकूल धोरण ठरविणारे होते. भारतातून कच्चा माल इंग्लडमधील कापडगिरण्यांना पुरवठा करु लागले. आणि याच गिरण्यांचा पक्का माल भारतीय बाजारपेठेत विकला जाऊ लागला. उदा. इंग्लड मधील 'मॅचेस्टर'चे कापड भारतात 'मांजरपाट' चा अपभ्रंश झालेल्या नावाने प्रसिद्ध होता. असे दुहेरी शोषण या मुक्त व्यापारातुन होऊ लागले. याचकाळात शेतीचे व्यापारीकरण घडून आले. भारतीय उत्पादनाशी स्पर्धा करावी लागू नये म्हणून त्यावर जास्तीचे कर लादले. कच्चा माल देशभरातून मिळविण्यासाठी वाहतुकीचे जाळे विणण्यात आले. त्याच मार्गाने इंग्लडमधील पक्का मालही देशभर पोहोचला. अशारितीने भारताचे शोषण करुन इंग्लडची समृद्धी वाढविण्याचे मुक्त व्यापारी धोरण होते. या धोरणामुळे भारतातील संपत्तीचा ओघ ब्रिटनकडे वाढू लागला होता. याबाबत लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख एकाच वाक्यात सांगतात, ''हिंदुस्थानची

# ३ भारतीय प्रबोधन

एकोणवीसावे शतक हे आधुनिक भारतातील समाजप्रबोधनाचे युग समजले जाते. पाश्चात्य शिक्षणाच्या संपर्कामुळे अनेक नवशिक्षितांच्या मनात नवविचार आणि कल्याणांचे वारे वाहू लागले. त्यामुळे भारतात सामाजिक व आर्थिक प्रबोधनाला प्रारंभ झाला. भारतात प्रबोधनाचा प्रारंभ पाश्चिमात्यांच्या संपर्कातून झाला. भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य सर्वप्रथम बंगाल प्रांतात स्थापन झाले व बांगल प्रांतातच सर्वप्रथम प्रबोधन चळवळ व जागृती घडली. त्या चळवळीतील आद्य समाज सुधारक राजा राममोहन रॉय हे आहेत. अठराव्या शतका अखेर भारताचे राजकीय विघटन झाले. देश शक्तिहीन व दुबळा बनला. भारतीय समाज अंधश्रद्धा, कर्मकांडाचे स्तोम अंधानुकरण, शब्द प्रामाण्य, परंपरा, जातीभेद व विषमता इत्यादी अनिष्ट प्रवृत्तीत अडकून गतिहीन बनला होता. तेव्हा बुद्धि प्रामाण्य, तर्कनिष्ठ नवे ज्ञान, आधुनिक विचारप्रणालीचे व मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन भारतीय समाजात वैचारिक जागृतीच्या युगाचा प्रारंभ करण्याचे मौलिक कार्य एकोणीसाव्या शतकाचा प्रारंभी राजा राममोहन रॉय यांनी केले.

## ♦ राजा राममोहन रॉय (इ.स. १७७२–१८३३)

राजा राममोहन रॉय यांना भारतीय 'प्रबोधनाचे जनक' म्हटले जाते किंवा 'आधुनिक भारताचे जनक' (पिता/निर्माता) असाही त्यांचा उल्लेख केला जातो. इतके महत्त्वाचे आणि मुलगामी कार्य त्यांनी केले आहे. सामाजिक व धार्मिक सुधारणांचा पाया त्यांनी घातला. खऱ्या अर्थाने त्यांच्याच काळापासून

- **जीवनपरिचय-**

राजा राममोहन्न रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी पश्चिम बंगाल मधील बर्दवान जिल्ह्यातील राधानगर या गावी एका सनातनी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रमाकातं राय व आईचे नाव तारणीदेवी होते. त्यांच्या घराजवळ अनेक मुस्लीम कुटुंबे राहत असल्यामुळे त्यांच्यावर फारशी भाषेचा आणि सुफी पंथाचा लहानपणीच प्रभाव पडला होता. त्यांनी कुराणाचा अभ्यास डोळसपणे व बुद्धीवादी दृष्टीकोनातुन केल्याने ते मुर्तीपूजेच्या विरुद्ध बनले, परंतु परंपरावादी ईस्लामी विचार त्यांनी कधीच स्विकारले नाही. ते स्वतंत्र वृत्तीचे होते. वयाच्या १५ व्या वर्षी त्यांनी मुर्तीपूजेचा निषेध करणारी पुस्तिका लिहिली होती. त्यामुळे त्यांचे वडील आणि राजा राममोहन रॉय यांच्यात मतभेद निर्माण होऊन त्यांना घराबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांनी आपल्या आवडीप्रमाणे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. देशातील अनेक भागात त्यांनी प्रवास केला आणि ज्ञानात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. भारतीय समाज, दारिद्रय व स्त्रीयांची हलाखीची परिस्थितीची जाणीव झाली. त्या सुधारणेसाठी आपण काहीतरी केले पाहीजे असे रॉयला वाटू लागले.

रॉय यांनी अरबी, फारसी, इंग्रजी, फ्रेंच, हिब्रु, ग्रीक व संस्कृत इत्यादी भाषांचा अभ्यास केला. त्यांनी बहुतेक सर्व धर्माच्या ग्रंथाचा अभ्यास केला. त्यांनी मुसलमान धर्मग्रंथाचा अभ्यास पूर्ण केल्यावर त्यांना जबरदस्त मौलवी

# ४ १८५७ चा उठाव

आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी एक अभूतपूर्व घटना म्हणून, एक महान अनन्य साधारण घटना म्हणून १८५७ चा उठाव या घटनेला मानले जाते. या घटनेच्या निमित्ताने पहिल्यांदा इंग्रज साम्राज्याविरुद्ध सर्व भारतीयांनी एकत्रितपणे उभे राहण्याची हिंमत केली. भारताच्या इतिहासात १८५७ च्या महान उठावा इतकी अत्यंत वादग्रस्त घटना दुसरी कोणतीही नसेल. उठावापासून आजपर्यंत या घटनेबद्दल हिंदी इतिहासकार, विचारवंत, नेते, इंग्रज राज्यकर्ते, परकिय इतिहासकार अशा अनेकांनी आपापली मते सांगितलेली आहेत. १८५७ च्या सशस्त्र उठावाला सर जॉन सीले, सर जान लॉरेन्स, स्मिथ, पी.ई. राबर्टस या इंग्रज इतिहासकारांनी एक "सैनिक विद्रोह" मानले, तर पट्टाभिसितारामैया, वि. दा. सावरकर, अशोक मेहता, संतोषकुमार रे, कर्नल मालसन, डॉ. सुरेन्द्रनाथ सेन आणि पंडित नेहरु यांनी भारताचा पहिला स्वातंत्र्य संग्राम असे मानले आहे. या घटनेचे स्वरुप इतके गुंतागुंतीचे होते की, त्यामागील कारणे, उद्दिष्टे, स्वरुप याबाबत इतिहासकारात एकवाक्यता आढळत नाही.

१८५७ च्या उठावा अगोदरही भारतात अनेक उठाव झालेत. परंतु या उठावा एवढा उग्र व व्यापक असे ते उठाव नव्हते. संन्याशांचे बंड (१७६३-८०). चुआर येथील उठाव (१७६५-८६), महाराष्ट्रात उमाजी नाईकचा उठाव, आंध्र प्रदेशातील पाळेगारांचा उठाव, १८४४ चा कोल्हापुरचा उठाव, उत्तर भारतातील जाट, रजपुत व बुंदेल्यांचे उठाव, विदर्भ व खानदेशातील आदिवासींचे उठाव. छोटा नागपुरातील कोलमांचा उठाव, बिहारमधील संथाळांचा उठाव,

ब्राह्मण शिपायाने ही बातमी फलटणीतील इतर शिपायांना सांगितली. ती वाऱ्यासारखी इतरत्र पसरली त्यामुळे उठावास सुरवात झाली. ''एनफिल्ड बंदुकांना गाईच्या आणि डुकराच्या चरबीचे आवरण लावलेले होते हे विदारक सत्य मान्य करावे लागते.'' असे सुप्रसिद्ध इतिहासकार लिके यांनी नमुद केलेले आहे. डॉ. ईश्वरीप्रसाद यांनी सुद्धा इंग्रजांनी या घटनेने भारतीयांच्या धार्मिक भावना पायदळी तुडविल्या असे मत नमुद केले आहे.

## ♦ १८५७ च्या उठावाची वाटचाल व प्रसार

चरबीयुक्त काडतूस प्रकरणाने हिंदु, मुसलमान सर्व सैनिक बिथरले त्यांनी उठावासाठी ३१ मे १८५७ हा दिवस निश्चित केला. परंतु अपवादात्मक अगोदरच सुरवात झाली. या उठावातील प्रमुख नेते म्हणजे मुघल बादशहा बहादुरशहा जाफर व त्याची पत्नी जीनत महल बेगम, अवधचा नवाब वजीदअली शहा व त्याची पत्नी बेगम हुजरत महल आणि त्याचा वजीर अलीनली खॉ, नानासाहेब पेशवे, रंगो बापुजी गुप्ते (सातरच्या छत्रपतीचा वकील), अजिमुल्हाल, तात्या टोपे, बिहारचा जमिनदार कुंवरासिंह व झाशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादी नेत्यांनी क्रांतीची योजना आखली होती. सर्वत्र संधान बांधून हे सर्व कार्य गुप्तरितीने चालू होते. अलीनली खॉ यांनी साधु व फकीरांच्या वेशात राहून लष्करी छावण्यात व इतरत्र क्रांतीचा प्रसार केला. फैजाबादच्या मौलवी अहमदशहाने लखनौ ते आग्रा पर्यंतच्या भागात सभा घेऊन क्रांतीचा प्रसार केला. उठावच्या अगोदर पासूनच तयारीला सुरुवात झाली. गंगेकाठच्या ब्रह्मवर्तातून सुत्रे हलू लागली होती. ज्यांची संस्थांने व जहागिरी एकापाठोपाठ एक खालसा होत गेली, अशांना नानासाहेब पेशव्यांची पत्रे जाऊ लागली होती. सैनिकांनीही क्रांतीच्या प्रसारासाठी लाल कमळ व चपातीद्वारे एका छावणीतुन दुसऱ्या छावणीत बातम्या पोहचविल्यात. कमळाचे फुल व चपाती उठावाचे प्रतीक ठरले. दिल्ली, विठूर, लखनौ, कलकत्ता व सातारा ही क्रांतीची पाच प्रमुख केंद्रे होती. तीर्थयात्रेच्या निमित्ताने नानासाहेबांने वकील अजीमुल्लासह दिल्लाला येऊन मुघल बादशहाला स्वातंत्र्य युद्धाची रुपरेषा सांगितली. त्यांनी अंबाला, मेरठ, मथुरा व लखनौ इत्यादी उत्तर भारतातील सर्व नगरांमध्ये जाऊन क्रांतीकारकांशी संपर्क स्थापन केला. ३१ मे रोजी सकाळीच इंग्रज विरोधी उठावाची प्रेरणा, दिल्लीवर विजय व